**नगरसचिव**

**पुणे महानगरपालिकेच्या कामाकरिता**

**पुणे महानगरपालिका – सूचना – कार्यपत्रिका क्र.१४**

**जानेवारी २०२२**

पुणे महानगरपालिकेची मासिक सर्वसाधारण सभा **गुरूवार,दि.२०/१/२०२२** रोजी **दुपारी ३:०० (तीन)** वाजता मा.महापौर, मा.पदाधिकारी व मा.पक्षनेते यांची पुणे महानगरपालिका भवन येथील कार्यालये तसेच प्रभागनिहाय क्षेत्रीय कार्यालयांतील प्रभाग समिती कार्यालये येथून दृक श्राव्य ( व्हिडीओ कॉन्फरन्सींग ) द्वारे भरेल.तसेच या कालावधीत मे.महाराष्ट्र शासन यांचे मा.मुख्यसभेस प्रत्यक्ष उपस्थितीबाबत आदेश आल्यास सदरची मासिक सभा हिंदवी स्वराज्याचे संस्थापक श्री छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात (पुणे महानगरपालिकेच्या नविन विस्तारीत इमारतीतील सभागृहात) भरेल.

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**वृत्तांत कायम करणे.**

**प्रश्नोत्तरे**

महाराष्ट्र म.न.पा अधिनियम, १९४९ चे कलम ४४ अन्वये प्रश्नोत्तरे.

**– स्थायी समितीचे ठराव –**

**विषय क्र.७१२**

**संदर्भ–** १) मा.मुख्य सभा ठराव क्र.७४ दि.२४/०५/२०११ व मा. स्थायी समिती ठराव क्र.२५९४ दि. ०८/०२/२०११.
२) मा. मुख्य सभा ठराव क्र. ८४९ दि. १८/०२/२०१६ रोजीचा ठराव.
३) कार्यालयीन परिपत्रक जा.क्र. शआ/जा/ज/१३९ दि. २६/०४/२०१६.
४) मा. स्थायी समिती ठराव क्र. ९४० दि. ०५/०१/२०२१.
५) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/शहर अभि./१३ दि. १९/४/२०२१ चे पत्र.
६) मा.सौ.वर्षा तापकीर, मा.सौ.मानसी देशपांडे यांची दि. २०/४/२०२१ ची उपसूचना
७) मा.स्थायी समिती ठराव क्र.१४४,दि.२०/४/२०२१
८) मनपा ठराव क्र.११३, दि.१७/८/२०२१

----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून तसेच स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

पुणे महानगरपालिका हद्दीमधील विना भोगवटा वापर व विना परवाना बांधकामासाठी खालीलप्रमाणे आकारण्यात येणाऱ्या तडजोड फी स व बाबीस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| क्र. | वर्णन | प्रस्तावित शुल्क/तडजोड फी (नियमान्वित होणाऱ्या बांधकामाकरीता) |
|---|---|---|
| १ | जोते तपासणी दाखला न घेता जोत्यावरील केलेल्या स्लॅबच्या बांधकाम क्षेत्रासाठी | ० ते १०० चौ.मी. ५०००/–<br>१०१ ते २०० चौ.मी. १००००/–<br>२०१ ते ३०० चौ.मी. १५०००/–<br>३०१ ते ४०० चौ.मी. २००००/–<br>४०१ ते ५०० चौ.मी. २२०००/–<br>५०१ ते ६०० चौ.मी. २५०००/–<br>६०१ ते ७०० चौ.मी. ३००००/–<br>७०१ ते ८०० चौ.मी. ३५०००/–<br>८०१ ते ९०० चौ.मी. ४००००/–<br>९०१ ते १००० चौ.मी. ४५०००/–<br>१००१ ते १५०० चौ.मी. ५००००/–<br>१५०१ ते २००० चौ.मी. ७५०००/–<br>२००० चौ.मी. च्या पुढे १०००००/– |
| २ | मान्य नकाशाव्यतिरिक्त वाढीव परवानगी न घेता विनापरवाना बांधकाम केल्यास व ते नियमान्वित करणे शक्य असल्यास | |

| | | |
|---|---|---|
| | १) निवासी वापराच्या बांधकामाकरिता<br>२) व्यापारी वापराच्या बांधकामाकरिता | रेडीरेकनरच्या दरानुसार बांधकाम खर्चाच्या १५%<br>रेडीरेकनरच्या दरानुसार बांधकाम खर्चाच्या २५% |
| ३ | अ) भोगवटापत्र न घेता वापर चालू केल्यास व कर आकारणी झाली असल्यास वैयक्तिक अर्ज करणाऱ्यास<br>**१) प्रत्येक निवासी सदनिका/बंगला**<br>अ) ६५० चौ. फूट कारपेट क्षेत्रापर्यंत<br>ब) ६५० ते १००० चौ. फूट कारपेट क्षेत्रापर्यंत<br>क) १००० चौ. फूट पुढील कारपेट क्षेत्रासाठी<br>**२) प्रत्येक व्यापारी गाळ्यांसाठी**<br>अ) ६५० चौ. फूट कारपेट क्षेत्रापर्यंत<br>ब) ६५० ते १००० चौ. फूट कारपेट क्षेत्रापर्यंत<br>क) १००० चौ. फूट पुढील कारपेट क्षेत्रासाठी | <br><br><br>५,०००/– प्रति निवासी सदनिका<br>७,५००/– प्रति निवासी सदनिका<br>१०,०००/– प्रति निवासी सदनिका<br><br>१०,०००/– प्रति व्यापारी गाळा<br>१५,०००/– प्रति व्यापारी गाळा<br>२०,०००/– प्रति व्यापारी गाळा |
| | ब) भोगवटापत्र न घेता वापर चालू केल्यास व कर आकारणी झाली नसल्यास<br>१) प्रत्येक निवासी सदनिका/बंगला | <br><br>अ) पहिल्या महिन्यासाठी र.रू.७५/– प्रति चौ.मी.<br>ब) नंतरच्या महिन्यासाठी र.रू.१०/– प्रति चौ.मी. |
| | २) प्रत्येक व्यापारी गाळ्यासाठी | अ) पहिल्या महिन्यासाठी र.रू.१५०/– प्रति चौ.मी.<br>ब) नंतरच्या महिन्यासाठी र.रू.२०/– प्रति चौ.मी. |

याशिवाय सदर प्रशासनाचे प्रस्तावामध्ये ज्या स्वरुपाच्या विनापरवाना बांधकाम नियमान्वित करण्याच्या तरतुदी नाहीत, तथापि सदरची विनापरवाना बांधकामे मंजूर विकास नियंत्रण नियमावलीतील तरतुदीनुसार नियमान्वित करणे शक्य आहे अशी बांधकामे नियमान्वित करण्यासाठी मा.मुख्य सभा ठराव क्र. ८४९ दि. १८/२/२०१६ रोजीच्या ठरावानुसार दर आकरण्यास

तसेच मे.शासनाने गुंठेवारी अधिनियम क्र. २७, २००१ मध्ये सुधारणा करुन दि. २/३/२०२१ रोजी केलेल्या सुधारित अधिनियमानुसार दि. ३१ डिसेंबर २०२० पुर्वीची बांधकामे नियमान्वित करण्यास शिफारस आहे.

**(टिप – सदर विषयाचा विचार माहे जानेवारी २०२२ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.७६१, दि.२३/१२/२०२१ चा झाला आहे.)**

**विषय क्र.७१३**

**संदर्भ–** १) मा. सुशिल मेंगडे यांचे दि. १६/१२/२०२१ चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र.१७३३,दि.२१/१२/२०२१

–––––

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –

प्रभाग क्र. ३१ अ मध्ये कर्वेनगर मधील ताब्यात आलेल्या जागेवर क्रिडांगण व उद्यान विकसित करणेसाठी र.रू. ९ लाखांचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावीअशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०२१–२२ चे अंदाजपत्रक, पान क्र.२७९,<br>बजेटकोड FE14C125/SM1-322<br>प्रभाग क्र.३१ अ महिला सबलीकरण अंतर्गत शिलाई मशीन पुरविणे | ९ लाख | ––– |
| नविन सुचविलेले काम–<br>प्रभाग क्र. ३१ अ मध्ये कर्वेनगर मधील ताब्यात आलेल्या जागेवर क्रिडांगण व उद्यान विकसित करणे | ––– | ९ लाख |

(मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवश्यावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.)

**विषय क्र.७१४**

**संदर्भ–** १) मा. गणेश बिडकर, सभागृह नेता व मा.सौ.मंजुषा नागपुरे यांचे दि.२४/११/२०२१ चे पत्र
२) मा.महिला व बाल कल्याण समिती ठराव क्र. ९६ दि. १५/१२/२०२१
३) स्थायी समिती ठराव क्र.१७४३,दि.२१/१२/२०२१

–––––

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –

पुणे संगम घाट येथे अनेक वर्षापासून दशक्रिया विधी व त्या अनुषंगाने विविध विधी पार पाडतात. सदर विधींचे वेळी दाढी व कटींग करण्याची प्रथा असून सदर ठिकाणी येणाऱ्या नागरिकांना सहजपणे न्हावी उपलब्ध होणे अत्यंत गरजेचे आहे. सद्यस्थितीत या ठिकाणी बाहेरून आलेले न्हावी येणाऱ्या नागरिकांना अवास्तव दराने वरील सेवा उपलब्ध करून देतात. परंतु सर्वसामान्य नागरिकांना रास्त दरात ही सेवा मिळण्याच्या दृष्टीने संगम घाट येथे पूर्व दिशेस श्री गणपतराव हरिभाऊ पंडित चरीटेबल ट्रस्ट या संस्थेस पत्र्याचे शेड ३० वर्षे कालावधीसाठी नाममात्र भाडे करारावर देणेसमान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**विषय क्र.७१५**

**संदर्भ–** १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/आरोग्य/१०११दि. २०/१२/२०२१ चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र.१७७९,दि.२१/१२/२०२१

–––––

मा.महापालिका आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन –

बालेवाडी स.नं.२०,२१ बाणेर स.नं.१०९ येथे उभारण्यात आलेल्या डेडीकेटेड कोव्हिड हॉस्पीटल ( डि.सी.एच ) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७(३)(क) अन्वये डॉ.भिसे मल्टिस्पेशालिटी हॉस्पीटल यांना ३ महिने कालावधीकरीता मुदतवाढ देवून चालविण्यास देणेस, त्यांचे बिल अदा करणेस व वाढीव करारनामा करणेस मा.मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करणेत येत आहे.

**विषय क्र.७१६**

**संदर्भ–** १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/आरोग्य/१०१२दि. २०/१२/२०२१ चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र.१७८०,दि.२१/१२/२०२१

–––––

मा.महापालिका आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन –

शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय शिवाजीनगर, पुणे५ येथील जम्बो कोव्हिड हॉस्पीटलला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७(३)(क) अन्वये मुदतवाढ देणेसाठीमा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवश्यावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावावर कार्यवाही करण्यास खालील बाबींस मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

१) COEP जम्बो कोविड हॉस्पीटल पुणे महानगरपालिकेमार्फत ऑक्टोबर २०२१,नोव्हेंबर २०२१ व डिसेंबर २०२१ या तीन महिन्याचे कालावधीकरिता चालविण्यास देणेस.

२) COEP जम्बो कोविड हॉस्पीटल चालविणेकरीता पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचेमार्फत निश्चित केलेल्या दरानुसार व अटी शर्तीनुसार यापूर्वी काम करणाऱ्या संस्थांची नेमणूक करणेस ( १.मेडब्रोज हेल्थकेअर प्रा.लि.२.दिपाली डिझाईन्स अॅन्ड एक्जिबिटस प्रा.लि.३.जेएसके मेडिकल सिस्टिम ) तसेच आवश्यकता भासल्यास अधिकच्या अटी शर्ती व इतर कामकाजाच्या दरांमध्ये मा.महापालिका आयुक्त यांची पूर्व मान्यता घेऊन अतिरिक्त फेरबदल करणेस.

३) उपरोक्त प्रमाणेच्या अटी व शर्तीनुसार होणारा खर्च खालील अर्थशिर्षकामधून खर्च करणेस व आवश्यकता भासल्यास वर्गीकरणाद्वारे रक्कम उपलब्ध करून घेणेस.

अर्थशिर्षक सन २०२१–२२
RE17F259
कोव्हिड १९ अंतर्गत जम्बो हॉस्पिटलसाठी खर्च.
मान्य तरतूद रक्कम रूपये ७५,००,००,०००/–

**विषय क्र.७१७**

**संदर्भ–** १) मा.महापालिका आयुक्त, पुणे मनपा यांची मान्यता ठ.क्र.६/१८९,दि.१०/६/२०२१
२) शासन निर्णय महसूल व वन विभाग सीएलएस–२०२०/प्र.क्र.१२३/म–३,दि.१६/३/२०२०
३) शासन परिपत्रक वित्त विभाग संकीर्ण–२०२०/प्र.क्र.५९/२०/कोषा.प्रशा–५,दि.१८/३/२०२०
४) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/भवन/१०४३दि. २१/१२/२०२१ चे पत्र.
५) स्थायी समिती ठराव क्र.१७८१,दि.२१/१२/२०२१

–––––

मा.महापालिका आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन –

वडगावशेरी मतदार संघातील राजीव गांधी रूग्णालय,येरवडा येथे ऑक्सिजन प्लांट निर्मिती करणे हे काम अतितातडीची बाब म्हणून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७(३)क अन्वये करणेत येत असलेल्या कामांच्या खालील बाबींची माहिती मा.मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करणेत येत आहे.

१) वडगावशेरी मतदार संघातील राजीव गांधी रूग्णालय, येरवडा येथे ऑक्सिजन प्लांट निर्मिती करणे हे काम ठेकेदार मे.यशराज ग्लोबल इन्फ्राकॉन एलएलपी यांचेकडून पुर्वगणित टेंडर रकमेच्या (जीएसटी,रॉयल्टी व टेस्टिंग चार्जेस वगळून येणारी रक्कम ) ५% कमी दराने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७(३)क अन्वये करून घेणेची,त्यासाठी त्यांना वर्क ऑर्डर देऊन त्यांचेशी करारनामा करून घेणेची व ठेकेदारास त्यांनी प्रत्यक्ष केलेल्या कामानुसार तथापि ५% कमी दराने अधिक जीएसटी, रॉयल्टी व टेस्टिंग चार्जेस नुसार येणाऱ्या एकूण र.रू.५५,८२,०००/-( र.रू.पंचावन्न लक्ष ब्याऐंशी हजार फक्त ) रकमेपर्यंत बिल आदा करणेची बाब.

२) या कामांचा खर्च र.रू.२५ लक्ष पेक्षा जास्त असल्याने पुणे मनपाच्या प्रचलित धोरणानुसार वरील ठेकेदारानी प्रत्यक्ष केलेल्या कामानुसार विशेष भाववाढ सूत्रानुसार (star rate) येणार रक्कम त्यांना अदा अथवा वसूल करण्याची बाब.

**<u>विषय क्र.७१८</u>**

**संदर्भ–** १) मा.सौ.श्रध्दा प्रभुणे-पाठक यांचे दि.१७/१२/२०२१ चे पत्र.

२) स्थायी समिती ठराव क्र.१७८२,दि.२१/१२/२०२१

-----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –

प्रभाग क्र.१०ब,मध्ये विविध विकास कामे करणेसाठी र.रू.६० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अ.क्र. | अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|---|
| १ | सन २०२१-२२ चे अंदाजपत्रक-पान क्र.५५<br>प्रभाग क्र.१०ब,मधील सागर कॉलनी व प्रभागात इतर ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे.ZE16B102/SD2-1070 | १० लक्ष | --- |
| २ | प्रभाग क्र.१०ब,मधील विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे.पान क्र.५५ ZE16B102/SD2-1068 | १० लक्ष | --- |
| ३ | प्रभाग क्र.१०ब,मधील श्रीकृष्ण कॉलनी, कैलास वसाहतव प्रभागात इतर ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे. पान क्र.५५, ZE16B102/SD2-1069 | १० लक्ष | --- |
| ४ | प्रभाग क्र.१०ब,मधील शास्त्रीनगर प्रभागात इतर ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे. पान क्र.५५ZE16B102/SD2-1071 | १० लक्ष | --- |
| ५ | प्रभाग क्र.१०ब,मधील जीत ग्राऊंड व प्रभागात इतरत्र फुटपाथ बनविणे. पान क्र.१७७, CE20A103/SA13-880 | १० लक्ष | --- |
| ६ | प्रभाग क्र.१०ब,विविध ठिकाणी फुटपाथ बनविणे पान क्र.१७६, CE20A103/SA13-879 | १० लक्ष | --- |
| नविन सुचविलेली कामे – | | | |
| १ | प्रभाग क्र.१०ब, मधील हमराज चौक व शास्त्रीनगर येथील उर्वरित ड्रेनेज लाईन टाकणे | --- | १० लक्ष |
| २ | प्रभाग क्र.१०ब,गोपीनाथ नगर, महात्मा सोसायटी उर्वरित फुटपाथ करणे | --- | १० लक्ष |
| ३ | प्रभाग क्र.१०ब,मधील हमराज चौकात उर्वरित ड्रेनेज लाईन टाकणे. | --- | १० लक्ष |
| ४ | प्रभाग क्र.१०ब,शास्त्रीनगर परिसरात कठीण खडक खोदून उर्वरित ड्रेनेज लाईन टाकणे. | --- | १० लक्ष |
| ५ | प्रभाग क्र.१०ब,मधील जीत ग्राऊंड व प्रभागात इतरत्र रस्ता विषयक काम करणे. | --- | १० लक्ष |
| ६ | प्रभाग क्र.१०ब,शास्त्रीनगर,सागर कॉलनी व इतर परिसरात ड्रेनेज विषयक कामे करणे. | --- | १० लक्ष |

**<u>विषय क्र.७१९</u>**

**संदर्भ–** १) मा.सौ.अर्चना पाटील व मा.बाळा ओसवाल यांचे दि.२१/१२/२०२१ चे पत्र.

२) स्थायी समिती ठराव क्र.१७८३,दि.२१/१२/२०२१

-----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून -

पुणे महानगरपालिका सेवा ( सेवाप्रवेश व सेवांचे वर्गीकरण ) नियम -२०१४ मध्ये खालीलप्रमाणे दुरूस्ती करण्यास मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अ.क्र | संवर्ग | पदनाम | नेमणुकीची पध्दत व टक्केवारी | नेमणुकीची अर्हता व नेमणुकांच्या पध्दती | प्रस्तावित सुधारणा |
|---|---|---|---|---|---|
| १३९ | अभियांत्रिकी सेवा श्रेणी -२ | उप अभियंता (स्थापत्य) | नामनिर्देशन -२५% | अ) मान्यता प्राप्त विद्यापीठाची अभियांत्रिकी शाखेची पदवी उत्तीर्ण असणे आवश्यक | पदोन्नती -१००% स्थापत्य अभियांत्रिकी शाखेची पदवी/पदविका ही शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या पुणे मनपाच्याआस्थापने वरील सेवाज्येष्ठता व गुणवत्ता या आधारे शाखा अभियंता ( स्थापत्य ) या पदावर कार्यरत असणे आवश्यक |
| | | | पदोन्नती -७५% | स्थापत्य अभियांत्रिकी शाखेची पदवी/पदविका ही शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या पुणे मनपाच्या आस्थापने वरील सेवाज्येष्ठता व गुणवत्ता या आधारे शाखा अभियंता ( स्थापत्य ) या पदावरील किमान ०३ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक | |

( टीप :- पुणे महानगरपालिकेकडील शाखा अभियंता ( स्थापत्य ) या पदावरील सेवकांची पदोन्नतीची कुंठीता घालविण्यासाठी वरीलप्रमाणे पुणे महानगरपालिका सेवा ( सेवाप्रवेश व सेवांचे वर्गीकरण ) नियम २०१४ मध्ये बदल करणे आवश्यक आहे.)

**विषय क्र.७२०**

**संदर्भ-** १) मा.सौ.वर्षा तापकीर व मा.सौ.सुनिता गलांडे यांचे दि.२१/१२/२०२१ चे पत्र.

२) स्थायी समिती ठराव क्र.१७८४,दि.२१/१२/२०२१

-----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून -

७४ व्या घटना दुरुस्तीनुसार अनुच्छेद ४७ प्रमाणे स्थानिक स्वराज्य संस्थांनी नागरिकांच्या आरोग्याचा स्तर उंचावणे ही एक प्राथमिक जबाबदारी आहे. त्याचप्रमाणे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६३ नुसार आरोग्य हे प्राथमिक कर्तव्य आहे. त्यामुळे महानगरपालिकांना नागरिकांच्या आरोग्यासाठी सक्षम यंत्रणा अस्तित्वात ठेवणे अनिवार्य झाले आहे. या विषयाचे/विभागाचे अनन्य साधारण महत्व विचारात घेऊन विभाग प्रमुख म्हणून आरोग्य अधिकारी (आरोग्य प्रमुख) हे पद अधिनियमातील कलम ४५ अन्वये वैधानिकरित्या भरणे बंधनकारक करण्यात आलेले आहे. तसेच हा विभाग इतका महत्वाचा आहे की कलम ४५(५) नुसार हे पद ४ महिन्यांपेक्षा जास्त दिवस रिक्त ठेवता येत नाही. यावरून असे निदर्शनास येते की, आरोग्य विभागामधील यंत्रणा कार्यक्षम रितीने कार्यरत राहणेसाठी विधानमंडळाने वैधानिक तरतुदी केलेल्या आहेत.

दुसरे असे की, पुणे शहराने गेल्या दोन शतकांमध्ये जगात येणा-या कोणत्याही महामारीचा उपद्रव पुण्यामध्ये मोठ्या प्रमाणात होतो हे देखील अनुभवलेले आहे. त्यामुळे इतर शहरांच्या तुलनेत पुण्याची आरोग्ययंत्रणा कायमस्वरूपी असणे हे आणखी गरजेचे ठरते. विशेषतः २००९-२०१० मध्ये आलेल्या एच १ एन१ महामारी आणि अलीकडीलच कोविड १९ या महामारीच्या पार्श्वभूमीवर खाजगी क्षेत्राऐवजी महापालिकेच्या आरोग्य यंत्रणेलाच नेतृत्व करून या महामारीचा सामना करावा लागतो हे वादातीत स्पष्ट झाले आहे. वरील पार्श्वभूमीवर आरोग्य यंत्रणेचे क्षमता उच्च प्रतीची ठेवावयाची झाल्यास त्या यंत्रणेचे नेतृत्व करणारी सर्व वरिष्ठ पदे कायमस्वरूपी भरलेली असणे अत्यावश्यक आहे. तसेच ते देखील शहरातील सर्व प्रशासन व विशेषतः आरोग्य क्षेत्राचा दीर्घ अनुभव असलेले अधिकारी असल्यास त्याचा निश्चितपणे फायदा होतो. तथापि, वस्तुस्थिती अशी आहे की, अनेक वेळेस ही पदे दीर्घकालाकरिता रिक्त राहतात व त्यामुळे आरोग्याची प्रशासकीय यंत्रणा विकलांग होऊन त्यांचा रुग्ण आणि नागरिकांचा आरोग्यावर विपरीत परिणाम होतो. अलीकडे ही परिस्थिती तर अत्यंत भयावह झालेली आहे. गेल्या सुमारे १० वर्षापासून आरोग्य अधिकारी (आरोग्य प्रमुख) व उप आरोग्य अधिकारी (उप आरोग्य प्रमुख) ही पदे रिक्त असून त्यांचा अतिरिक्त कार्यभार किंवा

राज्यशासनाकडील अधिका-याची बदली करून कसेबसे कामचलाऊ पद्धतीने आरोग्य विभागाचे प्रशासन केले जात आहे. उपआरोग्य अधिकारी पदे तर पूर्णपणेच रिक्त असून त्यांचा अतिरिक्त कार्यभार देखील दिला जात नाही. सामाजिक गरज, राज्यघटनेच्या तरतुदी आणि अधिनियमांतील तरतुदींचा एकत्रित विचार करता राज्यातील लोकसंख्येने दुसरे मोठे शहर असणा-या महानगरपालिकेच्या बाबतीत ही परिस्थिती बिकट असून त्यामध्ये अतित्वरेने सुधारणा होणे आवश्यक आहे.

वरील परिस्थिती का उद्भवली याचे विश्लेषण केले असता असे दिसून येते की सन २०१४ मध्ये वरील पदांचे शैक्षणिक अर्हता बदलली असल्यामुळे हा पेच प्रसंग निर्माण झालेला आहे. पूर्वी या पदांकरिता खाली नमूद तक्त्यातील कॉलम क्र.३ प्रमाणे शैक्षणिक अर्हता होत्या आता बदलून कॉलम ४ प्रमाणे केलेल्या आहेत. सदर अर्हता खरे म्हणजे बदलण्याची आवश्यकता नव्हती कारण या शहरापेक्षा लोकसंख्येने मोठ्या असलेल्या बृहन्मुंबई महानगरपालिका व या महानगरपालिकेतील आरोग्य विभागातील समकक्ष अधिका-यांच्या शैक्षणिक अर्हता देखील पुणे मनपाच्या पूर्वी असलेल्या शैक्षणिक अर्हते सारख्याच होत्या व त्यामुळे पुणे मनपाने केलेला बदल हा केवळ अनाठायीच नाही तर पदे भरण्यामधील महत्वाचा अडसर ठरला आहे. तो दूर केला नाही, तर सध्याची पदे रिक्त राहण्याची परिस्थती तशीच पुढे चालू राहून आरोग्य यंत्रणा विकलांगच राहील. त्यानुसार कॉलम ५ प्रमाणे शैक्षणिक अर्हता ठेवणे आवश्यक आहे.

| अ.क्र | पदनाम व संवर्ग | **सन २०१४ पूर्वी** पदांसाठी शैक्षणिक अर्हता | **सन २०१४ नंतर** पदांसाठी शैक्षणिक अर्हता व नेमणुकीची पद्धत व टक्केवारी | **प्रस्तावित** शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १. | **आरोग्य अधिकारी (आरोग्यप्रमुख) आरोग्य सेवा श्रेणी १** | The candidate must to hold a medical degree registerable under the Bombay Medical Act 1912 and in addition must possess either,<br>(a) A Diploma in Public Health of an Indian or Foreign University or The Royal College of Physicians and Surgeons of<br>(b) One of the following degree from an Indian or Foreign University. Doctor of Medicine, (State Medicine), Doctor of Science, (Public Health),Bachelor, Doctor of Master of Science. He must be further have experience of at least 5 years in a responsible Public Health Post. | **नामनिर्देशन**<br>**अ.**मान्यताप्राप्त विद्यापीठाची वैद्यकीय शास्त्रातील सार्वजनिक प्रतिबंधात्मक व सामाजिक आरोग्य शास्त्र शाखेची पदव्युत्तर पदवी {M.D. (P.S.M.)} परीक्षा उत्तीर्ण<br>**ब.**राज्य शासन/केंद्र शासन/स्थानिक स्वराज्य संस्था यांचेकडील सहाय्यक आरोग्य अधिकारी व तत्सम पदावरील किमान सात वर्षाचा पर्यवेक्षीय व कार्यकारी पदाचा अनुभव असणे आवश्यक<br>**क.**रुग्णालयातील प्रशासन सार्वजनिक आरोग्य व प्रतिबंधात्मक उपचारात्मक बाबी समर्थपणे हाताळण्याचा व विशेषत स्वच्छता पर्यवेक्षण,साथआजार निर्मुलन कार्यक्रम व हिवताप नियंत्रण आदी बाबींचा कार्याचा किमान पाच वर्षांचा प्रत्यक्ष अनुभव धारण करणाऱ्या उमेदवारास प्राधान्य<br>**पदोन्नती**<br>नामनिर्देशनासाठी विहित केलेली शैक्षणिक अहर्ताधारण करणाऱ्या पुणे महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील उपआरोग्य प्रमुख संवर्गातील अधिकाऱ्यांमधून सेवा ज्येष्ठता व गुणवत्ता या आधारे तीन वर्षाचा अनुभव आवश्यक<br>**प्रतिनियुक्ती**<br>(नामनिर्देशन व पदोन्नतीसाठी योग्य अधिकारी उपलब्ध न झाल्यास) नामनिर्देशनासाठी विहीत केलेली शैक्षणिक अहर्ता व | अ.महाराष्ट्र वैद्यकीय परिषद अधिनियम १९६५ मधील परिशिष्टानुसार रजिस्टरवर असलेले एम.बी.बीएस.व डिप्लोमा इन पब्लिक हेल्थ पदविका असलेले (विद्यापीठ आणि कॉलेज ऑफ फिजिशियन अँन्ड सर्जन,मुंबई)<br><br>(ब व क मध्ये काही बदल नाही.) |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | अनुभव धारण करणाऱ्या शासनाकडील योग्य अधिकाऱ्याच्या प्रतिनियुक्तीने | |
| २. | **उप आरोग्य अधिकारी (उप आरोग्य प्रमुख, उप आरोग्य प्रमुख (कुटुंबकल्याण) आरोग्य सेवा श्रेणी १** | १) मान्य विद्यापीठाची एम.बी.बी.एस. पदवी डी.पी.एच. पदविका उत्तीर्ण २) प्रशासकीय कामाचा विशेषतः सहाय्यक आरोग्य प्रमुख या पदाचा कमीत कमी ४ वर्षाचा अनुभव आवश्यक.<br>३) पुणे म.न.पा. उमेदवारास प्राधान्य दिले जाईल. | **<u>नामनिर्देशन</u>**<br>**अ.**मान्यताप्राप्त विद्यापीठाची वैद्यकीय शास्त्रातील सार्वजनिक प्रतिबंधात्मक व सामाजिक आरोग्य शास्त्र शाखेची पदव्युत्तर पदवी {M.D. (P.S.M.)} परीक्षा उत्तीर्ण<br><br>**ब.**राज्य शासन/केंद्र शासन/स्थानिक स्वराज्य संस्था यांचेकडील सहाय्यक आरोग्य अधिकारी/प्रभाग वैद्यकीय अधिकारी व तत्सम पदावरील किमान पाच वर्षाचा पर्यवेक्षीय व कार्यकारी पदाचा अनुभव असणे आवश्यक<br><br>**क.** रुग्णालयातील प्रशासन, सार्वजनिक आरोग्य व प्रतिबंधात्मक उपचारात्मक बाबी समर्थपणे हाताळण्याचा व विशेषत स्वच्छता पर्यवेक्षण,साथआजार निर्मुलन कार्यक्रम व हिवताप नियंत्रण आदी बाबींचा कार्याचा किमान पाच वर्षांचा प्रत्यक्ष अनुभव धरण करणाऱ्या उमेदवारास प्राधान्य<br>**<u>पदोन्नती (१००%)</u>**<br>नामनिर्देशनासाठी विहित केलेली शैक्षणिक अर्हताधारण करणाऱ्या पुणे महानगरपालिकेच्या आस्थापनेवर कार्यरत सहाय्यक आरोग्य अधिकारी संवर्गातील किमान तीन वर्षाचा अनुभव आवश्यक. | अ.महाराष्ट्र वैद्यकीय परिषद अधिनियम १९६५ मधील परिशिष्टानुसार रजिस्टरवर असलेले एम.बी.बीएस.व डिप्लोमा इन पब्लिक हेल्थ पदविका असलेले (विद्यापीठ आणि कॉलेज ऑफ फिजिशियन अँन्ड सर्जन,मुंबई)<br><br>(ब व क मध्ये काही बदल नाही.) |
| ३. | **सहाय्यक आरोग्य अधिकारी सहाय्यक आरोग्य प्रमुख (परवाना) सहाय्यक परवाना प्रमुख आरोग्य सेवा श्रेणी १** | एम.बी.बी.एस. उत्तीर्ण, डी.पी.एच. उत्तीर्ण/सरकारी निमसरकारी खात्यातील सार्वजनिक आरोग्यविषयक कामाचा ३ ते ५ वर्षाचा अनुभव आवश्यक. | **<u>नामनिर्देशन</u>**<br>**अ.**मान्यताप्राप्त विद्यापीठाची वैद्यकीय पदवी (M.B.B.S) व मान्यताप्राप्त विद्यापीठाची डी.पी.एच पदविका अनुभव सार्वजनिक आरोग्य विषयक कामाचा पाच वर्षांचा अनुभव<br>**<u>पदोन्नती</u>**<br>मनपा आस्थापनेवर कार्यरत नामनिर्देशनासाठी विहीत केलेली शैक्षणिक अहर्ता धारण करणाऱ्या वैद्यकीय अधिकारी किवा समकक्ष संवर्गाचा किमान पाच वर्षांचा अनुभव. | अ.महाराष्ट्र वैद्यकीय परिषद अधिनियम १९६५ मधील परिशिष्टानुसार रजिस्टरवर असलेले एम.बी.बीएस.व डिप्लोमा इन पब्लिक हेल्थ पदविका असलेले (विद्यापीठ आणि कॉलेज ऑफ फिजिशियन अँन्ड सर्जन,मुंबई) |

आणखी असे की, आरोग्य यंत्रणेतील ही पदे क्लिनिकल नसून प्रशासकीय आहेत. या पदांना केवळ मुलभूत वैद्यकीय ज्ञान असणे व त्यापेक्षाही महत्वाचे म्हणजे त्यांच्या बुद्धिमत्तेच्या उच्च स्तराचा प्रशासन करण्यास सक्षमता असणे अधिक महत्वाचे आहे. तसेच अधिक सक्षम प्रशासकीय अधिकारी नियुक्त करण्यासाठी मोठ्या प्रमाणात स्पर्धा होणे आवश्यक आहे. या पदांकरिता सध्या असलेली कॉलम ०४ प्रमाणे असलेली ही शैक्षणिक अर्हता तांत्रिकदृष्ट्या वरची असली तरी या शैक्षणिक अर्हतेचे उमेदवार तसे कमी असतात. त्यामुळे शहरासाठी जास्तीत जास्त मोठ्या संख्येने स्पर्धा होऊन त्यामध्ये सक्षम प्रशासकीय अधिकारी उपलब्ध होण्यास वाव राहत नाही कारण स्पर्धा व्यापक नसते.

अशा पद्धतीने शहरातील आरोग्य यंत्रणेतील वरिष्ठ प्रशासकीय पदे रिक्त राहू नये म्हणून मा. मुख्य सभेने दि. ०५/०१/२०१७ रोजी ठराव क्र. ९१६ अन्वये निर्णय घेतला होता. तथापि त्यानुसार

कार्यवाही करण्याऐवजी गैरसमजुतीतून आणि कोणतीही कारणमिमांसा न देता तत्कालीन महापालिका आयुक्तांनी सदर ठराव राज्यशासनास विखंडीत करण्यासाठी पाठविला होता. वास्तविकत: त्यांची ही भूमिका वर नमूद केलेल्या पार्श्वभूमीवर व्यापक जनहिताच्या विपर्यस्त होती. राज्यशासनाचे अंतिमत: हा ठराव त्यांच्या दि. ०२/०२/२०२१ रोजीच्या पत्रान्वये विखंडीत केल्याने हा समस्त पुणेकर नागरिकांच्या हिताच्या विरुध्द निर्णय आहे. शासनाने कलम ४५१ अंतर्गत ठराव विखंडीत केला आहे. या कलमांतर्गत महापालिका वैधानिक तरतुदींचा भंग करत असेल, अधिकारांची पायमल्ली करत असेल, सार्वजनिक शांततेचा भंग होत असेल, निधीचा अपव्यय होत असेल इत्यादी परिस्थितीत शासन महापालिकेचा ठराव विखंडीत करू शकते. महापालिकेचा ठराव कलम ४५१ मधील कोणत्याही तरतुदीमुळे बाधित होत नाही या उलट तो व्यापक जनहितार्थ असाच होता. सदर ठराव केवळ एका अधिका-याच्या गैरसमजुतीमुळे रद्द करण्यात आला ही ७४ व्या घटनादुरुस्तीतील "लोकप्रतिनिधींना अधिकार" या मूळ गाभ्याशीच विसंगत आहे. अर्थात ही मुख्यसभा विखंडीत झालेल्या ठरावाच्या बाबतीत विखंडन आदेश रद्द करावेत हे प्रस्तावित करीत नाही तथापि वर नमूद केलेल्या परिस्थितीत पुन्हा एकदा उपरोक्त नमूद केलेल्या तक्त्यातील कॉलम क्र. ५ मधील शैक्षणिक अर्हता विहीत करण्याबाबत ठराव करीत आहे. तसेच यासाठी इतिवृत्ताची वाट न पाहता या ठरावाची अंमलबजावणी करण्याकरिता प्रशासनाने राज्य शासनास प्रस्ताव मंजुरीसाठी पाठविण्यात यावा .

तसेच कोविड १९ महामारीच्या पार्श्वभूमीवर पुणे शहरातील आरोग्य यंत्रणा अधिक सक्षम करणे करिता व वैधनिक त्रुटी दूर करणे करीता पुणे मनपातील घनकचरा व्यवस्थापन विभागाकडील सहाय्यक आरोग्य प्रमुख (बायोमेडिकल वेस्ट) व सहाय्यक आरोग्य प्रमुख (सॉलीड वेस्ट मॅनेजमेंट ) या पदांचे पदनाम बदलून सहाय्यक आरोग्य अधिकारी करण्यात यावे व वरील दोन्ही पदे आरोग्य खात्याकडे वर्ग करण्यास मान्यता द्यावी,अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**विषय क्र.७२१**

**संदर्भ–** १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/विद्युत/१०४० दि. २१/१२/२०२१ चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र.१८०९,दि.२८/१२/२०२१

-----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन –

पुणे महानगरपालिकेकडून ओपन ॲक्सेसद्वारे वीज खरेदी करण्यासाठी ईईएसएल(EESL) ची उपकंपनी असलेल्या सीईएसएल (CESL)या शासकीय संस्थेबरोबरPower Purchase Agreement (PPA)करण्यास ज्यामध्ये २० वर्षापर्यंत र.रू. ३.४० / kwh या दराने वीज खरेदी करण्यास तसेचओपन ॲक्सेसद्वारे वीज खरेदी करण्यासाठी ईईएसएल(EESL) ची उपकंपनी असलेल्या सीईएसएल (CESL)या शासकीय संस्थेसोबत एसपीव्ही (SPV)स्थापित करणेस व(SPV)मधील सदस्य नियुक्तीचे अधिकार महापालिका आयुक्त यांना देणेसाठी खालील बाबीस मान्यता द्यावी अशी मा. मुख्य सभेकडे शिफारस आहे .

१. पुणे महानगरपालिकेकडून ओपन ॲक्सेसद्वारे वीज खरेदी करण्यासाठी ईईएसएल(ESSL) ची उपकंपनी असलेल्या सीईएसएल (CESL)या शासकीय संस्थेबरोबरPower Purchase Agreement (PPA)करण्यास ज्यामध्ये २० वर्षापर्यंत र.रू. ३.४० / kwh या दराने वीज खरेदी करण्यास,

२.ओपन ॲक्सेसद्वारे वीज खरेदी करण्यासाठी ईईएसएल (EESL)ची उपकंपनी असलेल्या सीईएसएल (CESL)या शासकीय संस्थेसोबत एसपीव्ही (SPV)स्थापित करणेस वSPV मधील सदस्य नियुक्तीचे अधिकार महापालिका आयुक्त यांना देण्यास,

**विषय क्र.७२२**

**संदर्भ–**
१. मा.मुख्य सभा ठराव क्र. ४२८ दिं.२०/१०/२००३.
२. मा.महापालिका आयुक्त ठराव क्र. ६/४४९ दिं.१२/०२/२००४.
३. मा.मुख्य सभा ठराव क्र. २४ दिं.२३/०४/२०१८.
४. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र. पीएमसी-२०२०/प्र.क्र. ३२२/ नवि-२२, दि. ३०/०६/२०२१ रोजीची अधिसूचना.
५. मा.मुख्य विधी विभाग यांचे आवक क्र. ४२५३ दिं.०९/०७/२०२१ चा अभिप्राय.
६. मा. महापालिका आयुक्त यांचा ठराव क्र. ६/२९३ दि. १२/०७/२०२१

७. मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/ Tax /१०५२,दि.२१/१२/२०२१ चे पत्र.

८) स्थायी समिती ठराव क्र.१८१०,दि.२८/१२/२०२१

-----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन –

पुणे महानगरपालिका कार्यक्षेत्रात नव्याने समाविष्ट झालेल्या २३ गावांचे नमुना ८ रजिस्टरला नोंद असलेल्या मिळकती व यापूर्वी आकारणी न झालेल्या मिळकतींची मनपाप्रमाणे कर आकारणी करणेसाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १२९ अ मधील तरतूद विचारात घेऊन, तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम परिशिष्ट ८ नियम ७ विचारात घेऊन त्यास यापूर्वी वेळोवेळी नव्याने समाविष्ट झालेल्या गावांची कर आकारणी मा. मुख्य सभेने मंजूर केलेल्या धोरणाप्रमाणे करणेत येत आहे. म्हाळुंगे, सूस, बावधन बुद्रुक, किरकि□वाडी, पिसोळी, कोंढवे – धावडे, कोपरे, नांदेड, खडकवासला, मांजरी बुद्रुक, नऱ्हे, होळकरवाडी, औताडे-हांडेवाडी, वडाची वाडी, शेवाळेवाडी, नांदोशी, सणसनगर, मांगडेवाडी, भिलारेवाडी, गुजर निंबाळकरवाडी, जांभुळवाडी, कोळेवाडी, वाघोली या गावातील मिळकतीच्या करपात्र रक्कम निश्चित करणेसाठीखालील बाबींस धोरणात्मक मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे .

१) समाविष्ट २३ गावातील सर्व आकारणी झालेल्या मिळकतींचा डे□, कागदपत्रे, रजिस□ इ. पुणे महापालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागाच्या ताब्यात घेऊन पुढील प्रशासकीय कामाची कार्यवाही करणेस,

२) समाविष्ट २३ गावातील ज्या मिळकतींची नोंद नमुना नं ८ च्या रजिस□ी आहे, त्यांची वार्षिक करपात्र रक्कम निश्चित करणेसाठी वरील प्रस्तावातील नव्याने समाविष्ट झालेल्या गावांची मिळकत कर आकारणी कार्यपद्धती व धोरण यामधील अ.क्र. ३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे "ज्या सालाचे घर, त्या सालचा दर" यानुसार (मा. महापालिका आयुक्त ठ.क्र. ६/४४९ दि. १२/०२/२००४ नुसार मान्यता) कर आकारणी करून वार्षिक करपात्र रक्कम निश्चित करणेस व सदर करपात्र रकमेनुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम नियम १२९ अ (१) अन्वये तसेच मा. मुख्य विधी अधिकारी यांचे संदर्भ क्र. ५ चे अभिप्रायानुसार सन २०२२-२३ हे प्रथम वर्ष विचारात घेऊन मिळकतीच्या करपात्र रकमेवर २०२२-२३ या आर्थिक वर्षातील मा. मुख्य सभेने मान्य केलेल्या दरानुसार सर्वसाधारण कर व इतर सेवाकर यांच्या एकत्रित बेरजेतून ग्रामपंचायत सर्वसाधारण कराची रक्कम वजा करून उर्वरित रक्कमेच्या २०%, ४०%, ६०%, ८०% व सन २०२६-२७ मध्ये १००% वाढीसह कराची आकारणी करणेस, तसेच पुढील कालावधीसाठी तात्कालीन म.न.पा दराने करांची वसुली करणेस.

| अ.क्र. | सन | टक्केवारी |
|---|---|---|
| १. | २०२२-२३ | २० % |
| २. | २०२३-२४ | ४० % |
| ३. | २०२४-२५ | ६०% |
| ४. | २०२५-२६ | ८०% |
| ५. | २०२६-२७ | १००% |

३) सदर ग्रामपंचायतीच्या नमुना नं ८ रजिस□ी नोंद असलेल्या व ग्रामपंचायत नमुना नं ८ रजिस□ी नोंद नसलेल्या मिळकतींची करआकारणी अंमलबजावणी दिनांकाबाबत मा. मुख्य विधी अधिकारी यांचा संदर्भ क्र ५ अन्वये खात्यास प्राप्त झालेला अभिप्राय अवलोकन होणेस व त्याप्रमाणे कार्यवाही करणेस.

४) ग्रामपंचायत मधील मिळकतींची कर आकारणी करताना ग्रामपंचायतीकडे सदर Built-up क्षेत्राप्रमाणे करीत आहेत, मनपा प्रचलित धोरणानुसार आकारणी करताना मिळकतीचे Carpet क्षेत्र विचारात घेतले जाते. त्यामुळे ग्रामपंचायत कडील नमुना ८ रजिस□ी नोंद असलेल्या मिळकतींच्या क्षेत्रफळाची मनपा प्रमाणे आकारणी करताना क्षेत्रफळामध्ये १०% वजाव□करून उर्वरित क्षेत्र आकारणीसाठी ग्राह्य धरणेस.

५) नव्याने समाविष्ट २३ ग्रामपंचायतीमधील नमुना ८ रजिस□ी ज्या मिळकतींची करासंबंधी नोंद झालेली आहे, तसेच ज्यांची ग्रामपंचायती हद्दीत असताना कर आकारणी झालेली नाही, अशा मिळकतींची कर आकारणी नजीकच्या भागात असलेल्या पुणे मनपाकडील मान्य वाजवी भाड्याच्या दराने पुणे महानगरपालिकेकडील प्रचलित पद्धतीनुसार कर आकारणी करणेस, देखभाल दुरुस्तीकरिता १०% सवलत देऊन मिळकतीची करपात्र रक्कम निश्चित करणेस.

६) नव्याने समाविष्ट झालेल्या २३ गावाकडील ग्रामपंचायत नमुना ८ रजिस□ी नोंद असलेल्या मिळकतींची कर आकारणी सन २०२०-२०२१ अखेर ग्रामपंचायतीकडील मिळकतकराची थकबाकी समाविष्ट करून आकारणी दि. ०१/०४/२०२२ पासून कार्यवाही करणेस.

७) नव्याने समाविष्ट २३ गावामधील नमुना ८ रजिस□मध्ये नोंद नसलेल्या विना परवाना बांधकाम असलेल्या नवीन मिळकतींची कर आकारणी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम २६७ अ नुसार मा. मुख्य सभेच्या मान्यतेप्रमाणे प्रचलित धोरणाप्रमाणे करणेस.

८) नव्याने समाविष्ट २३ गावात असलेल्या आय□ मिळकती, मोबाईल □र्स इ. स्वरूपाच्या मिळकतीची कर आकारणी पुणे म.न.पा. कडे सध्या प्रचलित असलेल्या कार्यपद्धतीनुसार करणेस.

९) समाविष्ट २३ गावातील ज्या मिळकतींची नोंद नमुना नं. ८ च्या रजिस□ी आहे, तसेच ग्रामपंचायत नमुना ८ रजिस□ी ज्या मिळकतीची करासंबंधी नोंद झालेली नाही, सदर मिळकतींची कर आकारणी करणेबाबत मिळकतकर विभागाकडील संबंधित पेठ निरीक्षक, विभागीय निरीक्षक, संपर्क अधिकारी, प्रशासन अधिकारी, परिमंडळ उप आयुक्त, तसेच सह महापालिका आयुक्त तथा कर आकरणी व कर संकलन प्रमुख यांना मिळकतींची कर आकारणी निश्चित करणेबाबत अधिकार सुपूर्त करणेस.

**<u>विषय क्र.७२३</u>**

**संदर्भ–** १) शासन निर्णय क्र.टिपीएस–१८२१/प्र.क्र.१०३/२०२१/नवि–१३,दि.२/८/२०२१

२) महापालिका आयुक्त ठराव क्र.६/७२,दि.११/५/२००७

३) नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र जा.क्र.टिपीएस १८१०/१६/प्र.क्र.२१००/ २०१०/नवि–१३,दि.१८/३/२०१०

४) शासन निर्णय क्र.टिपीएस–१८०७/२५२/प्र.क्र.६३०/०७/नवि–१३,दि.१५/११/२००७

५) महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम २००६,दि.५/२/२००७

६) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/अग्निशमन/९६९,दि.१३/१२/२०२१ चे पत्र.

७) मा.राहूल भंडारे व मा.बाळा ओसवाल यांची दि.१४/१२/२०२१ ची उपसूचना.

८) मा.सौ.मानसी देशपांडे व मा.सौ.मनिषा कदम यांची दि.२८/१२/२०२१ रोजीचे फेरविचाराचे पत्र.

९) स्थायी समिती ठराव क्र.१८४२,दि.२८/१२/२०२१

–––––

मा.स्थायी समिती ठराव क्र.१६८३, दि.१४/१२/२०२१ चा फेरविचार करण्यात आला.

मा.महापालिका आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन व मा.स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –

उंच इमारतींकरिता फायर प्रिमियम चार्जेस, अग्निशमन सेवा व वार्षिक फी चे सुधारित दरांसाठी खालील बाबींस मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

अ) अग्निशमन दलाकडून उंच इमारतींना तसेच विशेष वापराच्या विविध इमारतींना आग प्रतिबंधक उपाययोजनांच्या दृष्टीने करावयाच्या यंत्रणेसाठी प्राथमिक व अंतिम ना हरकत प्रमाणपत्र देताना मा.महापालिका आयुक्त यांच्या विषयपत्रासोबत जोडलेल्या परिशिष्ट–अ मध्ये नमूद फायर प्रिमियम चार्जेस दर अ.क्र.२ ते ६ या मधीलदर निम्मे करण्यास आणि मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रासोबत जोडलेल्या परिशिष्ट–ब मध्ये नमूद अग्निशमन सेवा फी च्या सुधारीत दरांना.

आ) महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ चे कलम १२(१)(क) आणि (ख) मधील तरतुदीनुसार परिशिष्ट–ब मध्ये नमूद अग्निशमन सेवा फी च्या सुधारित दरांना मा.मुख्य सभेची मान्यता मिळाल्यास मे.राज्य शासनाची अंतिम मान्यता मिळणेसाठी प्रस्ताव पाठविणेस.

इ) महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ चे कलम १२(१)(क) आणि (ख) मधील तरतुदीनुसार परिशिष्ट–ब मध्ये नमूद अग्निशमन सेवा फी व वार्षिक फी च्या सुधारित दरांना मा.मुख्य सभेने मान्यता दिल्यानुसार मे.राज्य शासनाची अंतिम मान्यता प्राप्त होईल या भरवशावर सुधारित दरांची आकारणी सुरू करून अग्निशमन ना हरकत प्रमाणपत्र अदा करणेस.

ई) मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रासोबत जोडलेल्या परिशिष्ट–ब मध्ये नमूद अग्निशमन सेवा फी च्या प्रस्तावित केलेल्या दरांमध्ये शासन मान्यता प्राप्त होताना घट झाल्यास जादा झालेली रक्कम संबंधित विकसकास परत करणेस किंवा त्याच प्रकल्पासाठी बांधकाम परवानगी प्रकरणी बांधकाम विकास विभागाकडे भरावयाच्या रकमेमध्ये समायोजित करणेस.

**मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवश्यावर मा.महापालिका आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.**

**याबाबत यापूर्वी करण्यात आलेला मा.स्थायी समिती ठराव क्र.१६८३, दि.१४/१२/२०२१ चा दुरूस्त करण्यात येत आहे**

**विषय क्र.७२४**

**संदर्भ–** १) मा.आबा बागुल यांचे दि.२७/१२/२०२१ चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र.१८४३,दि.२८/१२/२०२१

----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –

प्रभाग क्र.३५ब,मध्ये शिलाई मशीन खरेदी करणेसाठी र.रू.२० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०२१ – २०२२ अंदाजपत्रक<br>१) पान क्र.२८२ प्रभाग क्र.३५ब,मध्ये कचऱ्यासाठी इलेक्ट्रोनिक वाहन खरेदी करणे.<br>बजेट कोड क्र. FE17A277/SY १–२७९ | १० लक्ष | --- |
| २) पान क्र.१४०, प्रभाग क्र.३५ब, मधील झाडण कामासाठी कर्मचारी पुरविणे.<br>बजेट कोड क्र. RE19A153/SR११ – ४०२ | १० लक्ष | --- |
| नवीन सुचविलेले काम – | | |
| प्रभाग क्र.३५ब,मध्ये शिलाई मशीन खरेदी करणे | --- | २० लक्ष |

**मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवश्यावर मा.महापालिका आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.**

**विषय क्र.७२५**

**संदर्भ–** १) मा.दिपक पोटे यांचे दि.२८/१२/२०२१ चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र.१८४४,दि.२८/१२/२०२१

----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –

पुणे जिल्हा फुटबॉल संघटना व पुणे महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने स.नं.६१ ढोबरवाडी,घोरपडी येथील क्रिडांगण यांच्यामध्ये करार झाला होता. सदर कराराची मुदत संपत येत असल्याने सदर संस्थेला मुदतवाढ अकरा ( ११ ) वर्षे कराराने देण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**विषय क्र.७२६**

**संदर्भ–** १) मा.सौ.आरती कोंढरे यांचे दि.२७/१२/२०२१ चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र.१८४५,दि.२८/१२/२०२१

----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –

प्रभाग क्र.१८ब, मध्ये विविध विकास कामे करणेसाठी र.रू.४० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०२१ – २२ अंदाजपत्रक<br>पान क्र.२४५, प्रभाग क्र.१८ब, मध्ये महात्मा फुले पेठ येथील श्रमदान क्रीडा प्रतिष्ठान येथे मजला बांधणे. बजेट कोड – CE22A548/SJ10-3110 | ४० लाख | ---- |
| नविन सुचविलेली कामे – | | |
| प्रभाग क्र.१८ब, मध्ये पुणे मनपा ग.व.नी.सुलभ शौचालय व मुताऱ्या दुरूस्तीची कामे करणे. | --- | १० लाख |
| प्रभाग क्र.१८ब, मध्ये महात्मा फुले पेठ व शुक्रवार पेठ परिसरात समाज मंदिराची दुरूस्तीची कामे करणे. | --- | १० लाख |
| प्रभाग क्र.१८ब, मध्ये मनपा कॉलनी ६,८ व ९ येथे दुरूस्ती विषयक कामे करणे. | --- | १० लाख |
| प्रभाग क्र.१८ब, मध्ये मनपा शाळा, दवाखाने,पोलीस चौकी व समाज मंदिर परिसरात सी.सी.टी.व्ही.कॅमेरे बसविणे. | --- | १० लाख |

**विषय क्र.७२७**

**संदर्भ–** १) मा.सौ.आरती कोंढरे यांचे दि.२७/१२/२०२१ चे पत्र.

२) स्थायी समिती ठराव क्र.१८४६,दि.२८/१२/२०२१

----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –

प्रभाग क्र.१८ब, मध्ये विविध विकास कामे करणेसाठी र.रू.३० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०२१ – २२ चे अंदाजपत्रक<br>पान क्र.२४५, प्रभाग क्र.१८ब,रविवार पेठ येथील धोबी तालीम ट्रस्ट पुनर्बांधणी करणे. बजेट कोड – CE22A548/SJ10/3109 | ३० लाख | --- |
| नवीन सुचविलेली कामे – | | |
| प्रभाग क्र.१८ब, मध्ये महात्मा फुले पेठ व गंज पेठ परिसरात रस्ते डांबरीकरण करणे | --- | १० लाख |
| प्रभाग क्र.१८ब, मध्ये रविवार पेठ व शुक्रवार पेठ परिसरात रस्ते डांबरीकरण करणे | --- | १० लाख |
| प्रभाग क्र.१८ब, मध्ये घोरपडे पेठ व गुरूवार पेठ परिसरात रस्ते डांबरीकरण करणे. | --- | १० लाख |

**विषय क्र.७२८**

**संदर्भ–** १) मा.सौ.अर्चना मुसळे यांचे दि.२८/१२/२०२१ चे पत्र.

२) स्थायी समिती ठराव क्र.१८४७,दि.२८/१२/२०२१

----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –

प्रभाग क्र.८ब,औंध भागात विविध विकास कामे करणेसाठी र.रू.२० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०२१ – २२ चे अंदाजपत्रक, पान क्र. २७९,<br>प्रभाग क्र.८बमध्ये महिला कुस्ती प्रशिक्षण केंद्र विकसित करणे.<br>बजेट कोड – FE14C125/SM1-302 | २० लाख | --- |
| नवीन सुचविलेले काम – | | |
| प्रभाग क्र.८ब,औंध भागात विविध विकास कामे करणे | ---- | २० लाख |

**विषय क्र.७२९**

**संदर्भ–** १) मा.सौ.अर्चना मुसळे यांचे दि.२८/१२/२०२१ चे पत्र.

२) स्थायी समिती ठराव क्र.१८४८,दि.२८/१२/२०२१

----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –

प्रभाग क्र.८ब,औंध येथील पुणे महानगरपालिका मिळकतीवर विविध विकास कामे करणेसाठी र.रू.१० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०२१ – २२ चे अंदाजपत्रक, पान क्र. २११, CE20AC352/SB5-577<br>प्रभाग क्र.८ब,मध्ये औंध भागात सी.सी.टी.व्ही.बसविणे. | १० लाख | --- |
| नविन सुचविलेले काम – | | |
| प्रभाग क्र.८ब,औंध येथील पुणे महानगरपालिका मिळकतीवर विविध विकास कामे करणे | --- | १० लाख |

**विषय क्र.७३०**

**संदर्भ–** १) मा.सौ.सरस्वती राजाभाऊ शेंडगे व मा.सौ.मंजुषा दिपक नागपुरे यांचे दि.१५/१२/२०२१ चे पत्र.

२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.२०१,दि.२४/१२/२०२१

३) स्थायी समिती ठराव क्र.१८४९,दि.२८/१२/२०२१

----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –

प्रभाग क्र.२९ नवी पेठ– पर्वती येथील पर्वती चरण सोसायटी समोर, पर्वतीगाव पुणे–४११००९ येथील भारतमाता अभ्यासिका मधील पहिला मजला व्यायामशाळेसाठी स्वातंत्र्यवीर सावरकर मित्र मंडळ ट्रस्ट यांना नाममात्र भाडे दराने ३०(तीस) वर्षे कालावधीकरीता चालविण्यास देण्यास मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**विषय क्र.७३१**

**संदर्भ–** १)मा.धीरज घाटे मा.सौ.सरस्वती राजाभाऊ शेंडगे यांचे दि.८/१२/२०२१ चे पत्र.
२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.२०४,दि.२४/१२/२०२१
३) स्थायी समिती ठराव क्र.१८५०,दि.२८/१२/२०२१

----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –

प्रभाग क्र.२९ नवी पेठ – पर्वती येथील आंबिल ओढा कॉलनी, साने गुरूजी नगर, सदाशिव पेठ येथील भानुदास गेजगे व्यायाम शाळा वज्र प्रतिष्ठान यांना नाममात्र भाडे दराने ३०(तीस) वर्षे कालावधीकरीता चालविण्यास देण्यास मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**विषय क्र.७३२**

**संदर्भ–** १) मा.सौ.सरस्वती राजाभाऊ शेंडगे, मा.सौ.राजश्री काळे व मा.शंकर पवार यांचे दि.८/१२/२०२१ चे पत्र.
२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.२०६,दि.२४/१२/२०२१
३) स्थायी समिती ठराव क्र.१८५१,दि.२८/१२/२०२१

----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –

प्रभाग क्र.२९ नवी पेठ – पर्वती येथील पर्वती चरण सोसायटी समोर, पर्वतीगाव,पुणे–४११००९ येथील भारतमाता अभ्यासिका मधील दुसरा मजला भारतमाता महिला मंडळ ट्रस्ट यांना नाममात्र भाडे दराने ३०(तीस) वर्षे कालावधीकरीता चालविण्यास देण्यास मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**विषय क्र.७३३**

**संदर्भ–** १) मा.सौ.सरस्वती राजाभाऊ शेंडगे, मा.सौ.राजश्री काळे व मा.शंकर पवार यांचे दि.८/१२/२०२१ चे पत्र.
२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.२०७,दि.२४/१२/२०२१
३) स्थायी समिती ठराव क्र.१८५२,दि.२८/१२/२०२१

----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –

प्रभाग क्र.२९ नवी पेठ – पर्वती येथील पर्वती चरण सोसायटी समोर, पर्वतीगाव,पुणे–४११००९ येथील भारतमाता अभ्यासिका मधील तळमजला स्वातंत्र्य सावरकर मित्र मंडळ ट्रस्ट यांना नाममात्र भाडे दराने ३०(तीस) वर्षे कालावधीकरीता चालविण्यास देण्यास मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**विषय क्र.७३४**

**संदर्भ–** १)मा.धीरज घाटे व मा.सौ.सरस्वती राजाभाऊ शेंडगे यांचे दि.८/१२/२०२१ चेपत्र.
२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.२०८,दि.२४/१२/२०२१
३) स्थायी समिती ठराव क्र.१८५३,दि.२८/१२/२०२१

----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –

प्रभाग क्र.२९ नवी पेठ – पर्वती येथील नवी पेठ मधील कै.गोपाळराव बाळकृष्ण बुधकर उर्फ तात्या बुधकर अभ्यासिका वज्र प्रतिष्ठान यांना नाममात्र भाडे दराने ३०(तीस) वर्षे कालावधीकरीता चालविण्यास देण्यास मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**<u>विषय क्र.७३५</u>**

**संदर्भ–** १)मा.धीरज घाटे व मा.सौ.सरस्वती राजाभाऊ शेंडगे यांचे दि.९/१२/२०२१ चेपत्र.

२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.२०९,दि.२४/१२/२०२१

३) स्थायी समिती ठराव क्र.१८५४,दि.२८/१२/२०२१

----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –

वज्र प्रतिष्ठान, पुणे हे गेल्या अनेक वर्षापासून पुण्यातील विद्यार्थ्यांसाठी मोफत स्वरूपात विविध सामाजिक व शैक्षणिक उपक्रम राबवीत असते. अशा उपक्रमांचा लाभ गेल्या अनेक वर्षापासून गोरगरीब व गरजू विद्यार्थी घेत आहेत. या पुढील काळात जास्तीत जास्त गरजू विद्यार्थ्यांपर्यंत ही सेवा पोहचविण्याच्या दृष्टीकोनातून पुणे पेठ सदाशिव स.नं.७२१/२अ,फायनल प्लॉट नं.९८७ अ, इंदुलाल कॉम्प्लेक्स येथील तिसऱ्या मजल्यावरील गाळा क्र.३१४ हा वज्र प्रतिष्ठान, पुणे यांना शैक्षणिक उपक्रमासाठी पुणे महानगरपालिकेच्या संयुक्त विद्यमाने ३०(तीस) वर्षे कालावधीकरीता चालविण्यास देण्यास मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**<u>विषय क्र.७३६</u>**

**संदर्भ–** १) मा.सौ.मानसी देशपांडे व मा.सौ. सुनिता गलांडे यांचे दि. २३/१२/२०२१ चे पत्र.

२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.२१०,दि.२४/१२/२०२१

३) स्थायी समिती ठराव क्र.१८५५,दि.२८/१२/२०२१

----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –

बिबवेवाडी परिसरात कै. सतीश धोंडीबा मिसाळ प्रतिष्ठान यांचे मार्फ त युवक–युवतींमध्ये विविध क्रिडा प्रकारची व व्यायामाची आवड निर्माण करण्याचे कार्य गेली अनेक वर्ष केले जात आहे . तरी बिबवेवाडी ओटा येथील झंवर बॅडमिंटन हॉल व व्यायाम शाळा कै.सतीश धोंडीबा मिसाळ प्रतिष्ठान या संस्थेस नाममात्र दराने३०(तीस) वर्षे कालावधीकरीता चालविण्यास देण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**<u>विषय क्र.७३७</u>**

**संदर्भ–** १) मा.ॲड. सौ.वासंती जाधव व मा.सौ.हर्षाली दिनेश माथवड यांचे दि. २०/१२/२०२१ चे पत्र.

२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.२१२,दि.२४/१२/२०२१

३) स्थायी समिती ठराव क्र.१८५६,दि.२८/१२/२०२१

----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –

अलकापुरी सोसायटी येथील स्व.आ.रमेशभाऊ वांजळे सभागृह संयुक्त आझादनगर मित्र मंडळ यांना १ (एक) रूपया या नाममात्र भाडे दराने ३०(तीस)वर्षे कालावधीकरता चालविण्यास देण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**<u>विषय क्र.७३८</u>**

**संदर्भ–** १) मा.धीरज घाटे व मा. सौ. सरस्वती शेंडगे यांचे दि. ८/१२/२०२१ चे पत्र.

२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.२०५,दि.२४/१२/२०२१

३) स्थायी समिती ठराव क्र.१८५७,दि.२८/१२/२०२१

----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –

प्रभाग क्र. २९ नवी पेठ–पर्वती येथील लोकमान्यनगर, सदाशिव पेठ येथील भालजी तथा भालचंद्र कोल्हाटकर खेळाचे मैदान वज्र प्रतिष्ठान यांना नाममात्र भाडे दराने ३० (तीस) वर्षे कालावधीकरीता चालविण्यास देण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**विषय क्र.७३९**

**संदर्भ–** १) मा.महापालिकाआयुक्त यांचेजा.क्र.मआ/क्रिडा/१८८,दि.२४.०७.२०२० चे पत्र.
२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.३१,दि.१४/८/२०२०
३) स्थायी समिती ठराव क्र.१८५८,दि.२८/१२/२०२१

विषय– पुणे हडपसर स.नं.१६,१७ व १८ पैकी गोंधळेनगर येथील कै.रामचंद्र अप्पा बनकर शाळा येथील क्रीडा संकुलातील बॅडमिंटन हॉल,ग्रंथालय,व्यायामशाळा,योगा हॉल लिव्ह अॅण्ड लायसेन्स तत्वावर विहित अटी व शर्तीनुसार ताबा दिनांकापासून पुढील ३ वर्षाकरीता चालविणेस देणेबाबत.

----

मा.महापालिका आयुक्त यांनी त्यांच्या पत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन –

पुणे हडपसर स.नं.१६,१७ व १८ पैकी गोंधळेनगर येथील कै.रामचंद्र अप्पा बनकर शाळा येथील क्रीडा संकुलातील बॅडमिंटन हॉल,ग्रंथालय,व्यायामशाळा,योगाहॉल लिव्ह अॅण्ड लायसेन्स तत्वावर विहित अटी व शर्तीनुसार ताबा दिनांकापासून पुढील ३ वर्षाकरीता चालविणेस देणेबाबत निविदा मागविल्या असता आलेल्या निविदांपैकीअ.क्र. १ चे निविदादार सुजय पुरी,पुणे सासवड रोड, सत्यपुरम सोसा. लाईन नं.८ ए- फुरसुंगी, पुणे -०२ यांनी देऊ केलेले मासिक भाडे र.रू ८३,३००/- (र.रू.त्र्याऐंशी हजार तीनशे फक्त) म.न.पा.ने निश्चित केलेल्या मासिक भाडे रक्कमेपेक्षा ७,६०५/- ने जास्त असल्याने त्यांची निविदा स्वीकृत करणेस निविदा अटी व शर्तीनुसार निविदादारानी देऊ केलेल्या मासिक भाडे रक्कमे प्रमाणे ३ महिन्याचे भाडे अनामत रक्कम म्हणून व ३ महिन्याचे आगाऊ भाडे रक्कम स्वीकारणेस तसेच त्यांचेसोबत करारनामा करणेस मान्यताद्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

## मा.शहर सुधारणा समितीचे ठराव

**विषय क्र.७४०**

**संदर्भ–** १) दि. १६/१०/२०२० मा.विभागीय आयुक्त कार्यालय येथे मा. पालकमंत्री, पुणे तथा मा. उपमुख्यमंत्री यांच्या बैठकीतील आदेश.
२) मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.अति.मआ(वि)/परि.क्र.२/९३५ दि.०३/१२/२०२१ चे पत्र.
३) शहर सुधारणा समिती ठराव क्र.२०२,दि.२४/१२/२०२१

**विषय–** शिवाजीनगर घोलेरोड क्षेत्रिय कार्यालया अंतर्गत, प्रभाग क्र. १४ मधिल कामगार पुतळा, राजीव गांधीनगर व जुनातोफ खाना येथील शासकीय जागेवरिल मनपा व इतर निधीतून बांधलेल्या व पुणे महामेट्रो प्रकल्पाने बाधित होणाऱ्या सार्वजनिक मिळकती निष्कासित करून मनपा दप्तरी निरस्त करण्याबाबत.

----

मा.महापालिका आयुक्त यांनी त्यांच्या पत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन तसेच मा.महापालिका आयुक्त अवलोकन केले. तसेच शहर सुधारणा समितीमध्ये झालेल्या चर्चेस अनुसरून –

विषयांकीत कामगारपुतळा, राजीवगांधीनगर व जुनातोफ खाना येथिल सर्व झोपड्या निष्कासित होणार असून त्याठिकाणी शासकीय जागेवरील मनपा व इतर निधीतून बांधण्यात आलेल्या खालील सार्वजनिक मिळकती बाधीत होत असून सदरच्या व्यायामशाळा,समाजमंदिर,अंगणवाड्या या सार्वजनिक मिळकती निष्कासित करणे आवश्यक आहे. सदर मिळकतींचा तपशिल खालीलप्रमाणे–

| अ.क्र. | नकाशानुसार झोपडी क्र. | वास्तुचेनाव | मजले | क्षेत्रफळ | बांधकाम स्वरूप |
|---|---|---|---|---|---|
| १. | १५३ | गणेश मित्रमंडळ,व्यायामशाळा, राजीवगांधीनगर | तळमजला + पहिला मजला | ५० चौ. मी. | आर.सी. सी. |
| २. | ३९५/०१ | पतित पावनसंघटना, समाज मंदिर राजीव गांधीनगर | तळमजला + पहिला मजला | ३४ चौ. मी. | आर.सी. सी. |
| ३. | ३१६ | बौद्धविहार,राजीव गांधीनगर | तळमजला | २७.५२चौ.मी. | आर.सी. सी. |
| ४. | ८८४ | लहुजीवस्तादसाळवे, व्यायामशाळा,कामगार पुतळा | तळमजला + पहिला मजला | ११४ चौ.मी. | आर.सी. सी. |
| ५. | ९९५ | अण्णाभाऊ साठे समाजमंदिर, कामगारपुतळा | तळमजला + पहिला मजला | ७५ चौ.मी. | आर.सी. सी. |
| ६. | ४९५ | विरंगुळा केंद्र, कामगारपुतळा | तळमजला | ८० चौ.मी. | कच्चे |
| ७. | ६७६ | अंगणवाडी, कामगार पुतळा वसाहत | तळमजला | ११ चौ.मी. | कच्चे. |
| ८. | ६४४ | सुवर्णयुग महिला उन्नती केंद्र, महिला बचत गट, कामगार पुतळावसाहत | तळमजला + पहिला मजला | ८८ चौ.मी. | आर.सी. सी. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ९. | ८३४ | सम्राट अशोक बौद्धविहार, कामगार पुतळावसाहत,लोखंडी पुलाजवळ | तळमजला | २३.४५चौ.मी. पुढील पत्राशेड १६६.८५ चौ.मी. | बौद्धविहार बांधकाम पक्के व पुढील पत्राशेड कच्चे स्वरूपाचे |
| १०. | ४९७ | महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ, कामगारपुतळा | तळमजला | १२.८० चौ.मी. | पक्के |

वरिल बाबींचे अवलोकन होवून उपरोक्त यादीतील शासकीय जागेवर मनपा व इतर निधीतून बांधलेल्या व मेट्रो प्रकल्पाने पूर्णपणे बाधीत होणाऱ्या मनपा मालकीच्या सार्वजनिक मिळकती निष्कासित करून मनपा दप्तरी निरस्त करण्यास मान्यता द्यावी या भरवश्यावर कार्यवाही करावी,अशी मा. मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**विषय क्र.७४१**

**संदर्भ–** १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/टीडीआर/९४२ दि.०६/१२/२०२१ चे पत्र.
२) शहर सुधारणा समिती ठराव क्र.२०३,दि.२४/१२/२०२१

----

पुणे महानगरपालिकेकडून विविध कारणांमुळे जागा संपादन करताना देण्यात आलेल्या माहे नोव्हेंबर २०२१ मध्ये खालीलप्रमाणे अदा करणेत आलेल्या टी.डी.आर.ची माहिती मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| अ. क्र | आरक्षणाचा स.नं. | आरक्षणाचा प्रकार | डी.आर.सी. होल्डरचेनाव | टिडी आर झोन | ७/१२ नुसार क्षेत्र | टिडीआर देय क्षेत्रचौ.मी | डीआरसी क्र. | डीआरसी दिल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | पुणे, बालेवाडी, स.नं. १७/५/३ ( पैकी) | प्लेग्राउंड (पी.जी–२) | मे. शौर्य डेव्हलपर्स भागीदार संस्था तर्फे भागीदार अनुराग एस. बन्सल, देवेश गौतमलाल भंडारी | विरळ वस्ती | ३५०.०० चौ.मी | ३२७.२९ चौ.मी. X २.०० = ६५४.५८ चौ.मी. | ००५८८८ | नोव्हेंबर २०२१ |

**मा.महापालिका आयुक्त यांची पत्रे**

**विषय क्र.७४२**

स्वच्छ भारत अभियान व स्वच्छ महाराष्ट्र अभियान ( नागरी ) अंतर्गत पुणे महानगरपालिका ५ तारांकित मानांकन करणेबाबत मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/घनकचरा/१०७४,दि.२१/१२/२०२१ चे पत्र.

**विषय क्र.७४३**

स्वच्छ भारत अभियान आझादी@ ७५ स्वच्छ सर्वेक्षण २०२२ (SS2022 ) अंतर्गत पुणे शहर वॉटर प्लस मानांकनासाठी घोषित करणेबाबत मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/घनकचरा/१०७५,दि.२३/१२/२०२१ चे पत्र.

**नगरसचिव कार्यालय,**
**पुणे महानगरपालिका,**
शिवाजीनगर, पुणे ४११००५.
दिनांक :– १०/१/२०२२

**शिवाजी दौंडकर**
**नगरसचिव,**
पुणे महानगरपालिका.

**(टीप :– प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस्) नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)**

**सूचना –** कोरोना विषाणूमुळे उद्‌भवलेली परिस्थिती विचारात घेवून मे.केंद्र व राज्य शासनाच्या आदेशाचे तंतोतंत पालन करावे ही विनंती.